म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९८१

सन १९२५

# ...तोपायन.

REFBK-0002557
REFBK-0002557

ग.

गोविंदाग्रज-ग्रंथमाला पुष्प ४ थें

# गीतोपायन

अथवा

श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

बी. ए. एल्एल्. बी.

यांची

स्फुट-कविता

प्रकाशक

गोविंदाग्रज-मंडळ,

दादर, मुंबई.

दा. क्र. २५५७

REFBK-0002557

REFBK-0002557

किं. ६ आणे.

Printed at the "TATVA-VIVECHAKA PRESS" No. 3544, Parel Road, Bombay by Mr. Vithal Tanaji Modak, and Published by Mr. S. S. Gupte, Hon. Secretary, Govindagraj-Mandal, Dadar, Bombay.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
नं.
ता.
ठाणे.



श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बी. ए. एल्‌एल्‌. बी.

[ जन्मः—शके १७९२ आषाढ शु० १२ ]

# याचना !–

ही प्रस्तावना नाहीं, 'दोन शब्द' नाहींत व 'ओळख'ही नाहीं ! 'प्रस्तावना' नाहीं कवींची इच्छा म्हणून; 'दोन शब्द' नाहींत अर्धें पान लिहिण्यांत सत्याचा अपमान होतो म्हणून; आणि प्रस्तुत कवींची 'ओळख' करून देण्याचा आव घालून आरंभींच हास्यरसाचा प्रसार करण्याची इच्छा नाहीं म्हणून ही 'ओळख'ही नाही.

ही केवळ रसिकांजवळ क्षमेची याचना आहे. दोन महिन्यांपूर्वींच हातीं द्यावयास पाहिजे होतें तें "**गीतोपायन**" आज इतक्या उशिरां घेऊन येत आहोंत म्हणून क्षमा ! मुद्रणदेवतेची अनेकरूपी अवतार घेणारी अवकृपा वाचकहो, आपल्याला विदित आहेच; मग अधिक काय सांगणें ?

सर्वांचा नम्र सेवक,
**शंकर शांताराम गुप्ते**
चिटणीस, **गोविंदाग्रजमंडळ,**
दादर, मुंबई १४.

गणेशचतुर्थी
राज्यारोहण शक २४९.

ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ग्रंथ संग्रहालय ठाणे
ठाणे
दा. क्र. ........

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | तो दिन— ... ... ... ... ... | १ |
| २ | अनुपम सुख. ... ... ... ... ... | २ |
| ३ | खरी भाऊबीज. ... ... ... ... ... | ५ |
| ४ | तुळशीचें लग्न. ... ... ... ... ... | ७ |
| ५ | छत्रीचे उपकार. ... ... ... ... ... | ११ |
| ६ | भयंकर जागृति. ... ... ... ... ... | १२ |
| ७ | स्थित्यंतर. ... ... ... ... ... | १४ |
| ८ | एका स्त्रीची पर्जन्यविषयक कल्पना. ... ... ... | १७ |
| ९ | मृत अपत्याचें शेवटचें चुंबन. ... ... ... ... | १८ |
| १० | सुखकर जागृति. ... ... ... ... ... | २१ |
| ११ | विलक्षण न्यायसभा. ... ... ... ... ... | २९ |
| १२ | मृत अपत्याचें स्वप्नदर्शन. ... ... ... ... | ३१ |
| १३ | सृष्टिदेवता आणि हृदयदेवता. ... ... ... ... | ३४ |
| १४ | आगगाडी.... ... ... ... ... ... | ३५ |
| १५ | अढळ पद अथवा अंत्यजाष्टक. ... ... ... ... | ३६ |
| १६ | ईशस्तुति ... ... ... ... ... ... | ३८ |

## १ तो दिन–

( चाल.–कैकयिनें जें वचन मागिलें० )

मंचकिं पडले मरणोन्मुखसे प्रियतम ज्या कुदिनीं
तो दिन–माझ्या जाइल कैसा या स्मरणामधुनी ? । ध्रु० ।
ज्यासाठीं निजगृहा सोडिलें, केलि मही परकी,
प्राणांचा तो जिवलग जाई त्यजुनी परलोकीं;
न्हाउनि माखुनि दिव्य ठेविली, तनु ती प्रेमाची
सुकुनी गेली, वरी पसरली छाया मरणाची;
चुंबुनियां मीं त्रासविलें ज्या गालां दिनरजनी
ते रुसले मजवरती, गेले खोलचि तरुणपणीं !
गवाक्ष तनुचे अवचित सरले मागें नयन कसे
पंचप्राणां मार्गा देण्यालागीं निष्ठुरसे ?
ज्या वदनानें मधुर वचानें मोहित मज केलें,
कांति तयाची फिरली, अवचित मूक कसें झालें ?
चुंबूं कवणा ? उद्यां बाहुं मी कवणा कुरवाळूं ?
हा हा ! जाइल प्राणसखा हा माझा कनवाळू !
ज्या दिनिं बसलें घोर काळजीमाजी मी शयनीं
तो दिन–माझ्या जाइल कैसा या स्मरणामधुनी ? १
नयनां झांकुनि पुनरपि नाथें उघडे केले ते–
ओष्ठ हलविले–शब्द येइना–जिव्हा नच हलते–
ओष्ठीं मुद्रा मृत्युची बसे–तनुची हो लाही–
जीव घुटमुळे–सरली वस्ती जीवलोकिंची ही !
हा हा ! कां एकटीस टाकुनि जातां हो रमणा ?
कंटाळा इतुक्यांतचि आला माझा कां अपणां ?
ऐसें वदुनी मिठी मारिं मी शेवटची दीना !
आधिंच पडली मगरमिठी हत कालाची त्यांना !

उठुनी पाहें मुखाकडे–तों प्रेमभरें पहाती !
नेत्रांमधुनी अश्रुजलाचे बिंदु विपुल वहाती !
जीभ वळेना, परी लाविले नभाकडे डोळे;
अर्थ मनांतिल पूर्ण कळविला अल्प अशा काळें !
काय वर्णु मीं वाक्चातुर्या दिसलें जें नयनीं ?
तो दिन–माझ्या जाइल कैसा या स्मरणामधुनी ? २
'नको प्रिये गे शोक करूं, हा सत्वर आवर गे !
मी जातों, परि रहा सुखानें अकपटमृगसंगें !
दीन मी, परी मला वाहिलिस तनु सुंदर पाहीं;
स्वर्गीं जातों अधमाधम मी ठेवुनि नच कांहीं !
राजस बाळे ! होतील तुझे हाल वनामाजी !
जिकडे चंचल दृष्टि फेंकिसी तिकडे वनराजि !
हिंस्र पशूंचे कठोर रव ते कर्णिं सदा येती,
अनाथ तुजसम अबलांचे मृदु विलाप बुडवीती !
धीर न सोडीं, भाव धरीं गे, अजुनि असे त्राता;
जेव्हां होसी खिन्न बापुडी स्मर त्या भगवंता !
जातों आधीं, भाकिन करुणा तुज सुखि करण्यासी;
मागुनि ये तूं; राहुं सुखानें ईशपदापाशीं !'
दर्शवुनी हें स्वनेत्र मिटिले; झाली मज रजनी !
तो दिन–माझ्या जाइल कैसा या स्मरणामधुनी ! ३

[ मनोरंजन, पुस्तक ४ थें. सन १८९८–९९ ]

---

## २ अनुपम सुख.

( चाल–नंदनवनदेवीनें माझा० )

दयालु ईशें नश्वर जगतीं मनुजा जें दिधलें,
धन्य धन्य मी, अवघें तें सुख नुकतें अनुभाविलें !

रम्य निशा बहु होती; गगनीं चंद्रकला डोले;
स्वच्छ चंद्रिका भरुनि तियेनें जग हें जणुं न्हालें!
सुखदु:खांची शाश्वत मैत्री दावित त्या काला
वृक्षांच्या घन छाया होत्या पडल्या सुविशाला.
प्रेमदृष्टि मम वदनीं देउनि बसली प्रिय कांता.
वृक्षराजि ती स्तब्धचि राहे, क्षितिही निर्वाता.
झुळुक वायुची जरी उठे कधिं, भिउनी वाहे ते;
श्वासाचि सखिचा गमला असता, केश न जरि हलते.
प्रेमकथा करितांना न कळे काळ कसा जाई;
पवित्र भाषण तें परिसाया विश्व मुकें होई.
दृढालिंगनीं बसलों होतों, मग्न कथासरितीं;
प्रिय हृदयें जरि निकट, कथांचें कार्य अटोपीती!
बालपणाचा मार्ग क्रमिला पुनरपि दोघांनीं;
सुगंध कोमल कुसुमांचें जणुं उपवन गमत मनीं.
जडली कैशी प्रीति आमुची परस्परांवरती,
आणा शपथा वाहुनि केली मुद्रांकित अम्हि ती;
पितरांच्या संमतिची वाहिलि भीति मनीं कैशी;
मिळतां तीही शेवटिं मावे मोद न आकाशीं!
विवाह होतां घालविले दिन कैसे आनंदें
हंसुनी, रुसुनी, रमुनी, भ्रमुनी सदनीं स्वच्छंदें!
प्रेमा अनुपम पाहुनि ईशें वर्षाच्या अंतीं
बालकरूपें पारितोषिका धाडियलें जगतीं!
परस्परांच्या काढुनि साम्या चुंबितसूं बाला;
गुरुजन निकटीं असले तरिही स्थल नच लाजेला.
ज्या जागीं चुंबियलें एकें अन्यें त्या जागीं

चुंबावें लागलींच होउनि रोमांचित अंगीं !
लागोपाठ अशा रीतीनें चुंबित असतांना
तिन्हि वदनांचा संगम घडला दुसरें नसतांना !
यानंतर जेव्हां देवानें विपत्ति पाठविल्या,
लेशभर न त्या कालिं आमुच्या चित्तवृत्ति ढळल्या.
नीतिपथानें काळ काढिला आजवरी आम्हीं,
उत्तेजित अन्योन्यप्रेमें, स्थिर ईशप्रेमीं.
आयुष्याच्या मध्यभागिं अम्हि वसतों या कालीं,
सद्गुणफल अनुभवीत, चिंतित ईश दयाशाली.
'विधिनें दिधला एक जन्म, परि तच्चिंतनमार्गें
नर अनुभवितो अनेक सुखमय जन्मां सुंदरि गे.'
ऐसें वदतों प्रियेलागिं, तों अंबरमध्यातें
भेदुनि भूवरि पडला तारा धरुनी वेगातें.
मरणशकुन जाणुनी निरखिलें स्तिमित अशा नयनीं
एकामेकां, त्यानंतर निज लाविलि दृक् गगनीं.
असंख्य तारे अढळ चमकती उज्वलशा तेजें;
पाहुनि ईशा स्तविलें आम्हीं प्रेमें निर्व्याजें.
'हे जगदीशा, अंत करिसि जरि या तव बालांचा,
करिं एका क्षणिं, वियोग होवो नच एक पळाचा !
कुण्याहि देशीं देशी जन्मां, सवें तरी देई,
एका कालीं, एका स्थानीं, हीच विनति पायीं.
मुक्ति लाभुनी तुझ्या स्वरूपीं लीन जयीं होऊं,
दोघांच्या तैं तादात्म्यानें सुखानुभव घेऊं !'

[ मनोरंजन, पुस्तक ४ थें. सन १८९८–९९]

## ३ खरी भाऊबीज.

( साक्या )

मुंबानगरी आजी सजली दीपांच्या कांतीनें,
सहजमनोहर रमणी जैशी घालुनि वस्त्राभरणें. १

मुंबानगरें नाम लाविला भालीं ऐशा मिथ्या—
भासा उपजवि अवलोकनपथिं येई जी जी रथ्या. २

प्रतिगृह कंठीं बहु पदरांची अर्पि माळ दीपांची;
सदनांसन्मुख दीपरचितची नामें दिसति धन्यांचीं. ३

अंधकार निज कृष्ण मुखातें घेउनि गेला वाटे;
प्रकाश उज्ज्वल रिपु मर्दोनी चहूंकडे हा दाटे. ४

ऐशा समयीं बसलों होतों खिन्न अशा हृदयानें;
दीप भोंवतीं, परी अंतरीं अंधकार करि ठाणें. ५

नसति फटाके, आकारातें घेउनि सुटती फटके;
शून्य हृदयिं मम शब्द तयांचा न शिरे; द्वारीं अटके. ६

फुलबाजांनीं सुरंग सुमनीं बाग केलि ही नामी;
कंटकपूर्ण अशा मम हृदया काय येइ ती कामीं ? ७

आनंदाच्या समयीं ऐशा मम चित्ता कां पीडा ?
प्रकाश सन्मुख पडला मोठा, होती शब्द कडाडा. ८

नगरामधुनी दीप अखिलही आणुनि रचिले तेथें;
वाटे दारूकामहि सारें येथ जमोनि उडे तें. ९

हाय हाय ! हो हेंची कारण या मम उद्वेगाचें;
चिरसंवर्धित दुकान माझें अग्निमुखीं हें नाचे. १०

लोक दिवाळी पाहति, परि मम नयनांपुढें दिवाळें !
लक्ष्मी सारी गिळिलि हुताशनरिपुनें अल्पचि काळें. ११

क्षुधा शमविली पूर्वी अनला भस्म करोनी लंका;
सीतादेवी गिळुनि काढिली पुनरपि विगतकलंका. १२
तेंवी लक्ष्मी काढुनि पुनरपि अर्पिशील का मजसी ?
हरहर! केवळ कंठशोष हा; कुणि नच परिशिल यासी! १३
सोडुनि आशा पूर्ण निराशावश होउनि मी उठलों,
एकवार पाहुनियां प्रेमें सदना तिथुनि निघालों. १४
जाऊं आतां कुठें एकटा अफाट जगतामाजी ?
इतुक्यामध्यें स्मरली ताई, प्रेमस्थान असे जी. १५
भाऊबीज आज हो, साची वाट पाहुनी माझी
कंटाळुनियां जाइल, मजवरि करील बहु इतराजी. १६
तडक निघालों विद्युद्वेगें, गेलों तद्भवनातें;
भगिनी आली लक्ष्मी मम जणुं परतुनि, धरि हास्यातें. १७
या दिवशीं बहु भगिनींना हो ऊतचि ये प्रेमाचा,
अनुभव सर्वां; ताईचा परि प्रेमा नच वरवरचा. १८
'भाऊराया, वेळ असे ही का रे आगमनाची ?
मन हें वेडें, परि बंधूंना काळजी न वहिणींची!' १९
खोंचदार हें वचन वदोनी मंद स्मित करि ताई;
पाहुनि तें उद्वेग सर्वही क्षणांत विलया जाई. २०
चौरंगावरि बसवुनि भोजन करवीते मजकरवीं;
त्याहुनिही स्वादु भाषणातें बोलुनि खेद विसरवी. २१
भोजन झाल्यावरि पंचारति घेउनि सस्मित येई;
म्हणे, 'अतां मी सोडायाची नाहीं तुजला कांहीं! २२
ओंवाळणि तुजजवळुनि घेइन भाऊराया मोठी;
प्रमाद घडलासे तुजकडुनी, केलिस माझी खोटी.' २३

वच हें परिसुनि सगळा निरसुनि जाई मोद पळांत;
बोलें, 'ताई, गरिब भाउ हा; घे मजला पदरांत. २४
गोपीचंद जसा भिक्षेला ये भगिनीसदनातें
तेवीं मीही; निर्धन झालों; देउं काय वद तूंतें ?' २५
दैवाची काहणी कथियली; टपटप गळती बिंदु;
पंचारतिमधिं पाहुनि करुनी सुहास्य निज वदनेंदु २६
वदलि, 'पावली ओंवाळणि मज तव ही भाऊराया !
अमोल हीं तव अश्रुमौक्तिकें; जपुनी ठेविन मी यां. २७
अतुल प्रेमा दाविति हीं जडरूप तरी मजवरिचे;
देव्हाऱ्यांत सदा गंगेसम करीन रक्षण यांचें.' २८
वाणी गमली अमृतवृष्टि जणुं, आनंदें डुलुं लागें;
भाउबीज अशि प्रतिवर्षीं हो, हेंचि ईश्वरा मागें. २९

[ मनोरंजन, पुस्तक ४ थें. सन १८९८-९९ ]

---

## ४ तुळशीचें लग्न.

( दिंड्या )

रात्रिं तुलसीचें लग्न यथासांग
स्वतां उरकुनियां तद्विचारिं दंग
सुप्त झालों, तों स्वप्न एक देखें;
तुझ्याकरितां वाचका देत, ऐकें. १
वनस्पति होती सकळ जणों गोळा
परोपरिच्या पांघरुनि बहु दुशाला;
कुसुमरूपी घालोनि अलंकार
थाटमाटें थाटल्या सपरिवार. २
तेथ पाहें मी आम्र, सुरू, निंब,
पिंपळांचे, पपनसांचे कदंब.

स्थानिं एका मातल्या बोरि कांहीं;
अन्य ठायीं ठाकल्या नारळीही. ३

शिंदितार्डीचे वृक्ष जसे भूप
उभे झुपक्यांचे शिरिं धरोनि टोप;
असे नयनीं देखिले अमित वृक्ष;
परी दिसती ते युवतिविणें रुक्ष ! ४

याच वेळीं रमणीसमूह तेथ
मंदलीलागति हास्य करित येत.
कांहिं वृद्धा, नवपुष्पिताहि कांहीं;
दर्प त्यांचा दरवळुनि कसा जाई ! ५

कांहिं बाला तुलसीसभोंवतीं या
उभ्या राहोनि विनोदपूर्ण वाक्यां
बोलुनीयां तिज लाजविती भारी ;
समवयस्का त्या, कोण तयां वारी ? ६

रुचिर लज्जायुत देखुनी मुखाला
काय नामें लाजाळु वदे बाला—
'लाज सोडीं, ती योग्य नव्हे आतां;
शीघ्र बघशिल तूं आपुलिया कांता. ७

प्रौढ होशिल मत्समचि तूंहि जेव्हां
अशी लज्जा शोभेल मुळि न तेव्हां.'
धूर्त तुलसी परिसुनी या वचातें
मृदु स्पर्शें मिटविते तन्मुखातें. ८

पाहुनी हें कुमुदिनी पुढें झाली;
म्हणे, 'न धरीं संकोच अशा कालीं.

मित्र विलसे जैं दीप्त नभोभागीं
कोण धरितो संकोच गे अभागी ?' ९
मधुर हास्या तुलसी करोनि बोले,
'अम्हां आळा घालिती जन सुशीले;
पंकजा तूं जलनिवासिनी होसी;
कोण आळा तव घालि गे वचासी ?' १०
विनोदाच्या ओघांत चालतांना
पोंचल्या सगळ्याजणी अशा स्थाना,
विष्णु भुजगारूढ कीं जिथें होते
करित रमणीच्या मार्गप्रतीक्षेतें ११
ओषधींचा नृप निकट तो विराजे.
(प्रजाप्रेमा प्रकटविति चतुर राजे.)
गरुड सन्मुख जोडोनि करयुगाला
शेषवदनाग्रीं क्षिप्तदृष्टि ठेला. १२
हंसत मुरकत भूदत्तनयन बाला
मंजरींची प्रभुकंठिं अर्पि माला.
वंशवृक्षांनीं त्या क्षणींच नादा
करुनि दिधलें सर्वांसि अतुल मोदा. १३
रुळति पारंब्या चहुंकडेस ऐसा
उभा वट आहे वृद्ध ऋषिच जैसा;
पुढें येउनि सोडुनी प्राणवायु—
श्वास वदतो, 'विष्णो, असें चिरायु. १४
विलय पावति जैं जीव सकलहेतो
पार्णि कल्पांतीं तुजसि वागवीतों.
असे तुलसी मम आवडती बाला;
प्रेम ठेवुनि इज वागवीं दयाळा.' १५

वृक्ष नवरीतें बोध करिति नाना
अनुसरोनी स्वस्वभावांतरांना.
सुरू बोले, 'लाडके, अंगि ताठा
ठेविं नच तिळभरि, गणिति दोष मोठा.' १६
चंदनाचा तरु काय वदे पाहीं,
'दुष्टजनसंगें राहिं नच कदाही.'
मधुर शब्दां परिसुनी शेष डोले
अखिलभूभारक्षम अशा स्वभालें. १७
गोंद ढाळुनि नयनांतुनी विशाला
पाठिवरुनी फिरवुनी मृदु कराला
बाभळीचा तरु व धूलागिं बोले,
'अंगि मृदुता ठेवीं सदैव बाले.' १८
कडूलिंब वदे देउनियां आशी,
'गोड वागावें सर्व जनांपाशीं.'
चंद्र तदुपरि उपदेश गोड देई,
'सदा राहीं तूं निष्कलंक बाई.' १९
सुधारकवचनें या वचांशि तोळूं
लागतों, तों रव करिति पुन्हां वेळू;
सुमंगल वाद्यें परुष वाजवोनी
घालवीलें सुस्वप्न निर्दयांनीं. २०

[ मनोरंजन, पुस्तक ४ थें. सन १८९८–९९. ]

सं.काव्य ८१२



## ९ छत्रीचे उपकार.

( चाल.–वीरशिरोमणि सकलधनुर्धरनायक० )

छत्री गे मानितों तुज खरी मी अपुली माउली;
कृपेची करिसि बरी साउली. । ध्रु० ।
आटपसर कधिं वस्त्र चुण्यांचें नेसुनि येशी सवें,
यष्टिशी सेविसि मज गौरवें.
श्वापद रोखी मार्गा तेव्हां त्यातें तुज टोंचुनी
लावितों क्षणांत मी पळवुनी.
(चाल) कधिं खांचा खळगे अवचित पथ रोधिती;
कधिं तिमिर खुंटवी समूळ माझी गति;
सोपान कधीं मज उतरावे लागती;
ऐशा संकटिं देउनि टेंका रक्षिसि सांधे भली;
कृपेची करिसि बरी साउली. १
निज वस्त्रा कधिं रूप झग्याचें देउनि वातावरी
पोहसी; दिससि भव्य किति तरी !
चंद्रा जैसा परिवेष तशी शोभविसी मम मुखा;
दागिना कोण तुझ्यासारिखा ?
(चाल) मम शिरीं तरंगुनि या रीतीनें सदा
वारिसी रविकरोद्भूत सकल आपदा;
जल बळें निवारुनि विडंबिसी अंबुदा;
निवारितों नच नेतिस तरि नभिं दुर्धरवेगानिलीं;
कृपेची करिसि बरी साउली. २
दैवाच्या दुर्विपाकयोगें अग्नि जई पेटतो,
नराला सौधांतरिं गांठितो,
अथवा दुर्गावरी तयाला शत्रु जई कोंडितो,
भोंवतीं रक्षकगण ठेवितो,

( चाल ) जरि अससी त्याच्या सन्निध तूं देवता,
तो क्षणार्धांत करि तुजसह निज मुक्तता;
अग्निच्या जिभा अरिशर किंवा तत्त्वतां
पोंचति नच त्या; चुकविसि यापरि महासंकटावलि;
कृपेची करिसि बरी साउली. ३

अजुनी माते उपकार तुझा कथण्याचा राहिला,
पूर्वींच्याहुनि जो बहु आगळा.
मत्त वृषभ जैं दारुण गर्जत मजवरि ये धांवुनी
भिववितों उभारुनी तुज झणीं;
( चाल ) मार्गांनें भेटति खल जैं मजलागुनी,
व्यवधान म्हणोनी मध्यें तुज घालुनी
रक्षितों स्वतांला तद्दृष्टीपासुनी;
भर रस्त्यामधिं निर्मिसि यापरि निवांत खोली खुली;
कृपेची करिसि बरी साउली. ४

[ मनोरंजन, पुस्तक ४ थें. सन १८९८-९९ ]

---

## ६ भयंकर जागृति.

( चाल—कल्पतरू हे जिकडे तिकडे० )

‘ स्वप्नरूप ही जगती आहे. ’ वदती ज्ञानी मुनि,
सत्य सत्य तें, अनुभव याचा चुकला मज येउनी. ।ध्रु०।
श्रेष्ठ नरांनों तुह्मांसम मी होतों सौख्यार्णवीं;
उपभोगाची सेवित होतों वस्तु प्रतिदिनिं नवी;
लेखित होतों तुच्छ अंगना भोगार्हा समजुनी,
सुधारकांना बोल लावुनी मंडित कुमतें जुनीं;
स्वातंत्र्य नसे स्त्रियांसि योग्यचि, निसर्गतां त्या कुधी,

ऐशा वचनां बरळत होतों हिंदु समाजामधीं.
पारि मंचकासि मी खिळलों एके दिनीं;
चहुंकडोनि लागति वृश्चिक मजलागुनी;
यमदूत नभांतुनि येत दिसति धांउनी;
सुशील भार्या समीप राहुनि बाष्प सोडि नयनीं;
ऐशा स्थितिमाधिं मूर्छित झालों; नष्ट न कां तत्क्षणीं ! १

जागृत होउनि देखें सन्मुख तों आश्चर्या बघें;
भार्या माझी संमुख राहे, परि वदण्या मन न घे;
नेहमिंची चर्या, द्विगुणित परि झालीशी ती दिसे;
लीनपणा जाउनी उग्रता साक्षात् तेथें वसे;
मान घालुनी खालीं वदण्या उघडें निज ओष्ठ, तों
त्यांवरि जिरला भाव मनांतिल, तिळही नच उमटतो;
हें पाहुनि किंचित् हंसुनि वदे भामिनी,
' स्वप्नामधिं होतां आपण माझे धनी;
परि विसरा सगळें, दक्ष रहा सेवनीं;
स्वप्नीं वागविलें मज तैसें वागवीन छळुनी.'
तिरस्कारयुत बोलुनि दावी महानसा तर्जनी. २

महानसामधिं शिरुनि बघें, तों अवचित दिसला यति;
नासाग्रींची दृष्टि काढुनी लावी पाकाप्रती;
दंड नसे, परि जवळीं होती तक्र कराया रवी;
छाटिऐवजीं मुकटा नेसुनि दक्ष तिला नाचवी;
पृच्छा करितां कळे, यति न तो, विधुर असे बापुडा;
पत्नी जातां आप्ताच्या गृहिं कंठि काळ वांकडा !
तो म्हणे, 'येथल्या ललना मेधावती;
त्या चिंतनवेगें चोंहिकडे धांवती;

दर्शनमात्रें मनिंचे विचार तर्किती;
स्त्रीमंत्री चालविती राज्या सुयंत्र पुरुषांवरी;
स्वप्नगत परी स्मरुनि सुकृत कुणि सुख वर्षिति पतिशिरीं. ३
वाचकहो, हा जागृत्यनुभव तुम्हां जागे करो;
काळ असे तोंवरीच तुमचा मत्तपणा आवरो;
करुणेसाठीं कराल न जरी, स्वरक्षणार्थचि तरी
सुखी करा या स्त्रिया बापुड्या त्यजुनि अळस भीतरीं;
दाक्षिणांग निज सतेज करण्या वामांगार्धा जपा;
वाम मार्ग टाकुनियां सेवा दाक्षिण्या, आटपा;
अर्धांगवायु तरि चुकेल स्वप्नामधीं;
जागृतीवरीही उपभोगा सुखनिधि;
ना तरि व्हा दुःखी अनंतकालावधि.
मरणापलिकडच्या या बोला धिक्कारा नच कुणी;
अविश्वास पितृवचिं धरुनि फसे वीरसेन नरमणि. ४

[ मनोरंजन, पुस्तक ४ थें. सन १८९८-९९ ]

---

## ७ स्थित्यंतर.

( साक्या )

अर्ध शतक मज पुरें जाहलें सोडुनि या मद्ग्रामा;
उत्कंठेनें येथ पातलों बघण्या पुनरपि धामा. १

निराश झालों परी क्षणांताचि, गेली हुरुप लयाला;
लहानशा ग्रामाऐवजिं मज शहर पडे दृष्टीला. २

चिंचोळे लघु मार्ग नाहिंसे होउनि त्यांच्या ठायीं
राजमार्ग हे विस्तृत विलसति; कोण जनांची घाई ! ३

२५५७

मार्ग नसति हे, रौप्याचे परि पत्रे असति सफेत,
कालानें घण मारुनि केले पूर्वीच्याहुनि वितत. ४

प्रतिसदनें तृणशिरस्त्राण तें अल्पमोलसें त्यजुनी,
कौलांची पिळदार पगाडि शिरिं चढविलि गर्वें पडोनी. ५

गर्वाचें घर खालीं वदती; परि हीं येथिल सदनें
मूर्तिमंत अभिमान असुनि हितगुज कथिती सह गगनें. ६

आकाशदिव्यांच्या रूपानें तुरे खोंविले त्यांनीं,
अथवा धरिल्या करिं रोंवाया विजयपताका गगनीं. ७

सिंदूरांकित शांत तरूंचा सोडुनि आश्रय देव,
घंटायुत आलयीं बैसले; उघडे त्यांचें दैव. ८

हरितपल्लवाच्छादित बसलों ज्या वृक्षांच्या खालीं,
स्तंभ होउनी प्रासादां ते सांवरिती या कालीं. ९

पुण्य वात ज्या ठायीं वाहे पूर्ण मधुर गंधानें,
त्यासि दूषवी बाष्पयंत्र निज अपवित्र श्वासानें. १०

मार्गांनीं हिंडलों, परंतु न दिसती कोणी स्नेही;
बहुधा पडले कालाच्या मुखविवरीं, नसती देही. ११

अंगुलि दावुनि चेष्टा करिती बालें क्रमितां रथ्या,
अंतरिं नेणुनि तत्पितामही माझ्या बालवयस्या. १२

बालक हो ! अनुभव घ्या अपुल्या यथेच्छ बाल्यसुखाचा;
हंसा पोटभरि; पुढती येइल तुम्हां त्रास जीवाचा. १३

तुम्हांसम मी असें एकदां आनंदी अवलोका;
परि आतां जावेंसें वाटे इतरांसम परलोका. १४

उद्विग्न असा पुढें चाललों, नवल एक तों देखा !
वृद्ध स्त्रीतें करीं धरुनि पथिं चालवि तरुणी एका. १५

मनीं दचकलों पाहुनि तें सस्मित बालेचें वदन;
मुखचंद्र कसा कालराहुनें राहुं दिला हा पूर्ण ? १६
तप्तसुवर्णोपम देहाच्या तापें त्रस्त अमूप,
अंगवेत्रिकेप्रती भिडनि कीं काल न येइ समीप ? १७
वृद्धेचें मुख पाहुनि तत्क्षणिं संशय जाइ लयाला;
करिं मज काला क्षमा, तुजवरी वृथारोप मीं केला. १८
बाला ती वृद्धेची नात, प्रतिमा जशी तियेची;
वृद्धा ती पूर्वींची बाला, खनि जी लावण्याची. १९
तरुणांना आराध्यदेवता हीच एकदां होती,
निज सौंदर्यें शोभवि अखिल ग्रामा विभ्रममूर्ति. २०
ज्या गालांवरि तरंग बघण्या तत्पर तरुणीं व्हावें,
त्याच गोल गालांनीं कैसें खोल सदाचें जावें ? २१
कालगतीतें जुमानुनी नच रुचिरतरचि जी होई,
निर्दय दैवें वांकविली गुरुवयोभरें तनु तीही ! २२
ज्यांच्या तीक्ष्ण कटाक्षांचा तो स्वप्निंहि नेम न चुकला,
तेच नेत्र हे हृततूणीर स्वस्थ बसति या काला. २३
आभरणें यत्तनुची शोभा लोपविती निज दोषां,
व्यवधान तिला आवश्यक हो ! योग्य असे का ईशा ? २४
कृशतम कटि जी मध्यें होती मांसलशा देहाच्या,
सांप्रत कालीं ती वरि राहे दुहेरि कृशतर तनुच्या ! २५
ज्या चरणांवरि तरुणवृंद तो नम्रचि लोळण घेई,
त्या चरणांवरि नम्र होतसे पलित तिची ही डोई ! २६
देवा इजसम अंध मला कां केलें नच या कालीं ?
केलें असतें तरी वेदना तीव्र नसति मज झाली. २७

असो; हेंच मुख परंपरेनें निर्मुनि याच कुलांत
सौंदर्याची परमावधि ही शाश्वत करिं जगतांत. २८
ऐसें चिंतुनि तडक निघालों, आलों नगर त्यजुनी;
अजुनी स्मृति ती होतां जाई काळिज हें करपोनी. ! २९

[ मनोरंजन, पुस्तक ५ वें. सन १८९९-१९०० ]

---

## ८ एका स्त्रीची पर्जन्यविषयक कल्पना.

( चाल—एडका मदन० )

ऐसा बाई, पाऊस पाहिला नाहीं ! । ध्रु० ।
अंबा नभिं पीठ नीट दळते,
जात्यांतुनि तें झरझर गळतें ?
किंवा ती हे गव्हले वळते
अमुची आई ? पाऊस पाहिला नाहीं !
अथवा पाहुनि अवघी पृथ्वी
धाय मोकलित 'अंबे देवि !'
पान्हा फुटला, स्तन दुग्धा वी
शत धारांहीं ? पाऊस पाहिला नाहीं ! २
घनचक्रीं कीं तंतु कांतुनी,
विणुनि विजांच्या ते धोट्यांनीं,
वसनें फेंकि भराभर वरुनी ?
किति चतुराई ! पाऊस पाहिला नाहीं ! ३
एका क्षणिं एककृतिद्वारा
धरणीमुखिं दुग्धाच्या धारा
सोडि, लपवि तें ओढुनि पदरा !
किति ममता ही ! पाऊस पाहिला नाहीं ! ४

[ मनोरंजन, पुस्तक ६ वें. सन १९००-०१ ]

---

## ९ मृत अपत्याचें शेवटचें चुंबन.

( दिंड्या )

अहा बाळा ! कां टाकुनी अम्हांसी
आज होसी अवचित स्वर्गवासी ?
काय गमला हा विरस मर्त्यलोक,
पूर्ण राहे जो पातकीं अनेक ? १

लाड पुरला नच आमुच्याकडोनी,
म्हणुनि गेलासी स्वर्गीं कीं उडोनी ?
दुग्धि मातेच्या पाहुनियां खोड,
जासि चाखाया अमृत काय गोड ? २

बोल बाळा एकदां गोड बोल;
शब्द अव्यक्तहि गमति मज अमोल.
तुझ्या वचनां या कर्णिं सांठवीन,
तयां प्रेमें आमरण आठवीन. ३

गजबजावें तव मंजु वचें गेहें,
मूक तुजसम तें आजि पहा राहे.
जाइ आत्मा केवळ तयामधोनी,
अम्हां मृतपिंडां मागुती त्यजोनी ! ४

लाभ काय असे पुसुनि तुला प्रश्न ?
उत्तरांतें देईल अतां कोण ?
मींच अपुली समजूत करुनि द्यावी,
अभाग्याच्या हें लिखित असे दैवीं ! ५

मला ज्यांनीं बघुनी सतेज व्हावें,
नेत्र मिटिले ते नेहमिंचे दैवें !

सिद्ध परिसाया शब्द मत्पदांचे,
बधिर झाले ते कर्णही सदाचे ! ६

तुझा मजवरि विश्वास असे मोठा,
परी अंतीं ठरला असेल खोटा;
जई काळाची शिरिं पडे कुऱ्हाड,
निकट रडतचि बैसलों जसा भ्याड. ७

अश्रु गळती हे, नसति अमृतबिंदु,
तुझें संजीवन जयांकरविं साधूं.
स्नेह वाहे हा ज्योत पेटवाया;
अग्निविण तो परि जाइ मुळीं वायां. ८

तुला माझा आत्माचि गणित होतों,
दूर झाला सर्वथा भ्रम परी तो.
पडसि निश्चेतन लोचनांसमोर,
परी आत्मा मम सोडिना शरीर ! ९

आटपोनी जैं सर्व कामधंदा
घरा परतें मी करुनि गति अमंदा,
दुरुनि पाहुनि तव फुल्ल वदनपुष्पा
निमिषमात्रीं श्रम पावतसे लोपा. १०

घरीं येण्या उत्साह अतां काय,
आड होतां दृष्टिच्या तुझा काय ?
पाहतां त्या सुखमया गृहा शून्य
करूं रुदनाहुनि कार्य काय अन्य ? ११

एकदां मीं दाविला कोप मिथ्या;
अश्रुपूर्ण परी पाहुनी त्वदास्या

तुला धरिलें हृदयाशिं करुनि घाई;
स्मरण होतां रोमांच उठति देहीं ! १२

पुढें मोठा तूं थोर निपजशील,
सुज्ञ, धार्मिक, सुंदर, क्षमाशील,
सकारण ऐशी होति मला आशा;
पळामध्यें ती जाहली निराशा ! १३

शीघ्र चालाया लागलासि जेव्हां,
मला स्वप्निंहि वाटलें नसे तेव्हां,
शीघ्रगतिनें कीं एक दिनीं स्वर्गीं
जावयाची सिद्धता करिशि अंगीं ! १४

कडेवरुनी तुज मींच कसा ओढूं ?
उदरिं भूमीच्या स्वकरिं कसा सोडूं ?
अदय कीटक तुजवरी क्षमेंतील,
हाय ! बघतां तुज झडप घालितील ! १५

तुला विवरीं लोटिल्यावरि मनास
स्वयें बघण्याची होइलची आस;
धरुनि उत्कंठा येइन मी जेव्हां,
दर्शनातें देशील काय तेव्हां ? १६

भूमि होइल पर्जन्यकालिं आर्द्र;
तुझ्या भोंवतिं माजेल पंक सांद्र;
शीतपीडित तव करुण रुदन खास
पोंचणार न मज सुखासनस्थास. १७

मीच येतों तुजसवें भूमिकेंत;
राहुं अन्योन्यसमागमीं सुखांत;

तुझा आहे हा दूरचा प्रवास,
हवी सोबत तुज नेणत्या मुलास. १८
निवारण करिती अदय समीपस्थ;
तनयजनकांसी बघति करूं वियुक्त !
असो; आतां अंतिंची भेट बाळा
देइं, अससी या जिवासी जिव्हाळा. १९
दृढालिंगन देउनी एकरूप
तुजशिं होतों, निमिषांत विगतताप !
घेउनीयां चुंबना मुखेंदूचे
शोषितों मी तुज अंतरीं स्वतांचे ! २०

[ मनोरंजन, पुस्तक ६ वें. सन १९००-०१ ]

---

## १० सुखकर जागृति.

( साक्या )

आम्रतरूच्या छायेखालीं पडलों एके कालीं,
भागीरथीप्रियेच्या अंकीं ठेवुनियां निज मौलि. १
आम्रतरु दुजा क्षितिजावरि जो घेत असे विश्रांति,
दुरुनि पाहिला; जाण्याची तन्निकट उपजली प्रीति. २
दूरदूरची वस्तु निकटिंच्या वस्तुहुनी प्रिय भासे,
व्यक्ताहुनि अव्यक्त पदार्थचि प्रिय गमतो, हें कैसें ? ३
स्मरणपटावरि अंधुक ऐशा नरा दिसति ज्या रेखा
त्याच गिरवुनी पुनरपि मिळवी शांतिसुखा तो देखा. ४
भोंवतालच्या वस्तु वास्तविक इतक्या असती ग्राम्य,
दूरस्थचि कीं असतां दिसती नयनांतें त्या रम्य. ५

प्रकृति मूळ अव्यक्त असे जी तत्साम्यातें वाहे
पदार्थ तो कीं स्मरणपथीं तिज आणुनि प्रिय गमताहे. ६
किंवा दुर्लभ वस्तु सदोदित नरा हवीशी वाटे;
अमर्याद अभिलाष निसर्गा अखिला आकळुं थाटे. ७
अशा विचारीं मग्न जहालों, तों मज निद्रा आली;
अस्फुटसृष्टिरहस्या दावूं सिद्धाचि जणों जहाली. ८
स्वप्नामध्यें भूगोलींचा आत्यंतिक दूरस्थ,
झालि लालसा देखायाची निज नयनांहिं पदार्थ. ९
दुसऱ्या गोलार्धीं मत्स्थाना स्थान विरुद्ध असे जें,
वस्तु कोणती मोहकतेची खनि त्या स्थलीं विराजे? १०
पुरुष असेल तरी त्या मानिन मित्र खरा निःसीम;
असेल ललना तच्चरणीं तरि वाहिन अंतर्याम. ११
ऐसा निश्चय करुनि निघालों मनोविमानिं बसोनी,
कल्पनामयी अन्नसिद्धता पूर्ण सवें घेवोनी. १२
मार्गीं जातां इराण लागे, जेथें यवन अनेक
तत्रस्थांना करीत दिसती रुधिराचा अभिषेक. १३
किती इराणी पळती घ्याया आश्रय हिंदुस्थाना;
सार्धचंद्र घेउनी पताका अनुसरती रिपु त्यांना. १४
चमत्कार हा बघुनि निघालों, तों दिसलें बगदाद,
कुराणपठनाचा मशिदीमधिं जेथिल चाले नाद. १५
उंच मनोरे येऊं बघती माझ्या गमनाआड,
अर्धचंद्र देण्याची परक्या पुरुषा धरुनी चाड. १६
सकल मुखेंदुसि परिवेषानें बुरख्याच्या रूपानें
वेष्टुनि ललना चालति यौवनदत्त सलील गतीनें. १७
स्नानगृहीं स्नानकृत्य उरकुनि पेटवुनीयां हुक्का
अमिर लांबशा गप्पा झोंकिति, जणुं हुक्क्यांच्या नलिका. १८

नळी, यवनमुख, कूर्चरंध्र, यांमधुनि शुद्ध होऊन
धूम्र जाइ वरि तिर्यग्गतिनें नलिकामातृसमान. १९
नृपति हरूनल्रशीद मार्गीं चाले बदलुनि वेषा
वजीर खोजा सवें घेउनी; बघुनि पावलों तोषा. २०
मानिं वदलों, कीं ‘ महाभाग मम समकालीन असे हा !
आजवरी मज पूर्ण फसविलें इतिहासांनीं हा ! हा ! २१
परतोनी जाइन स्वदेशा पर्यटना उरकोनी,
बहु सन्माना पात्र होइन प्रमाद हे दावोनी.’ २२
पुढें लागलें बाबिलोनपुर अति सुंदर, विस्तीर्ण,
उंच तटीं संरक्षित, मोहक उद्यानीं संकीर्ण. २३
सरल सुरेख पथांनीं केलें अवाढव्य जणुं जाळें;
मजसम नवखा सांपडेल तरि निघेल काधिं नच काळें. २४
हेंच नगर का इतिहासांनीं केलें जें स्मृतिशेष ?
मूर्ख, अंध का होते लेखक ? स्वप्नीं काय अनीश ? २५
ऐसें चिंतुनि तिथुनि निघालों, अरबस्थानिं रिघालों;
उष्ट्रांचा समुदाय विलोकुनि अतीव अंतरिं धालों. २६
हे उष्ट्रा ! मूर्तिमंत अससी अगस्त्य तूं जलपानीं;
दुष्ट कंटकांच्या दोषांही घालिसि पोटीं ज्ञानी. २७
परोपकारा संपादाया सदा झिजविशी काया,
सौंदर्यातें तुच्छ मानिसी, उच्च अससि पशुराया ! २८
व्यापक दृष्टि करोनी गणिसी भोंवतालच्या भागा
नीरस मरुदेशासम, अससी तत्त्वज्ञाचि शरभा गा ! २९
थोर जाति त्या मार्गें जावें अनुसरोनि या न्याया
घंटायुत उंटांच्या मागें चालें लागोनीयां. ३०
कांहिं दिनांनीं सर्व पातलों मक्केप्रती समेत;
निमाज पढलों अनन्यभावें जावोनी मशिदींत. ३१

मुझ्ला आज्ञापितां म्हणाया ईशस्तुतिसि अमूक
संतोषविलें त्या उच्चारुनि पुरुषसूक्त बिनचूक ! ३२
पुढति चालतां गगनस्पर्धी आड मनोरे येती;
त्यांतें चुकवुनि विमान धांवे पवनतुल्य पुढपुढती. ३३
नील नदीच्या स्कंधावरि जें करि वसति शिकंदर्या
त्या पावोनी विस्मित झालों पाहुनि त्याची चर्या. ३४
नानादेशी नानावेशी जन फिरती निज कार्या;
राधास्कंधीं हरिच विविधमुख नदीस्कंधिं हा दर्या ! ३५
एकाएकीं धूम चालली; नगरिं लागली आग;
जनसमुद्र तिजशीं झोंबाया धांवे तेथ सवेग. ३६
मद्विमानही अग्निकीटसें ज्वालांवरि करि हल्ला,
ऐशा अवसरिं जीभ अग्निची चाटुनि गेली कल्ला ! ३७
पावकराया ! पावन करण्या मज कां केली घाई ?
कृष्णांगुष्ठा चुंबाया जणुं उसळे यमुनामाई ! ३८
दूर जाहलों अग्निचुंबना पुसुनी गालावरुनी,
तों कळलें हा पुस्तकसंग्रह जाई खाक जळोनी ! ३९
कपोल चोळित वदलों, कीं हे कपोलकल्पित खास
मुखविवरीं अग्निच्या शिराया योग्य असति इतिहास. ४०
मग नीलनदीप्रवाहमार्गें विमान चालू केलें,
नीलाकाश वरी, नीलोदक खालीं, ऐशा डौलें. ४१
मध्यें नौका भेटलि एका, जीमधिं सुंदर खाशा
बसल्या होत्या तरुणी, रतिहुनि रूपिं आगळ्या ऐशा ४२
दुर्बिण लावुनि बघें, दिसे तों अँटनिचें प्रियपात्र,
अनिमिष नयन इच्छि नर यत्तनु बघुनी सुललितगात्र. ४३
एक करें प्रियकरकंठातें मिठी मारुनी बाला
कुसुमदलातें दुज्या करानें तोडि कंठधृतमाला. ४४

क्षणांत एका प्रेमरसें निज रमणाधरासि खंडी,
दुज्या क्षणीं निज अधर चावितें प्रणयक्रोधें चंडी. ४५
गुलाब कुसुमा निज गालावरि अर्पुनि पृच्छा करित,
'मर्यादा कोणती फुलाची सांगा चतुरा त्वरित.' ४६
स्तुतिपर वाक्यें लाजवुनी तिज कुसुमकपोलांमधलें
तारतम्य ओळखुनी रमणें कठिण कूट सोडविलें ! ४७
रमणी नयनज्वाला मजवरि प्रेषुनि करील दूरी
मुखिंच्या वैषम्यातें, ऐशी आस होति मज भारी. ४८
सुंदर वस्तूच्या संसर्गें कुरूप जाइ लयाला,
अग्नि अग्निसी विझवी, यांचा प्रत्यय असता आला. ४९
केलिमग्न परि तिजला बघुनी पुढें चाललों खेदें;
तदनंतर वालुकाप्रदेशीं मुख डबडबलें स्वेदें. ५०
इतुक्यामध्यें काय जाहला चमत्कार तो ऐका;
युद्ध भारती दुरुनि हेरिलें चालत मार्गीं एका. ५१
युद्धरीति ही नूतन मजला गमलि मनापासोनी,
जिच्यामुळें सदनक्षेत्रादिक चुके वस्तुची हानि. ५२
युयुत्सु लोकां कर जोडुनि मी एक करीं उपदेश,
'परस्परीं झुंजाया निवडा पुढति सहारा देश.' ५३
भारतियुद्धसमय ठरवाया दवडुं नये ही संधि,
म्हणुनि थेट पोंचलों चालली जेथ रणाची गर्दी. ५४
'पांडव हो ! कौरव हो ! थांबा ! करा लढाई बंद;
प्रश्न एक करिं, तोंवरि तुमची वीरश्री हो मंद. ५५
लढुनि जाल अजि, परी मागुती पडेल पंचाईत.
सुकर युद्ध हें, नच करणें परि तत्काला निर्णीत. ५६
संपात असे बोला झडकरि कवण्या नक्षत्रांत ?
सप्तर्षींचा थवा कोणत्या स्थानीं मग्न तपांत ? ५७

युधिष्ठिराचा किति वर्षांनीं होणार शकारंभ ?
कलियुग केव्हां होईल सुरू ? सांगा मज अविलंब. ५८
धर्मराज कधिं जाइल नश्वर जग सोडुनि निजधामा ?
रामकथा यापूर्वींच झाली, कीं भावी अभिरामा ? ५९
अंत्य प्रश्न परिसुनि कपिराया पार्थरथध्वजवासी !
हंससी कां तूं दाखवुनीयां शुभ्र दंतमालेसी ? ६०
अकार्य करुनी जाल, परी तें निस्तरणें आम्हांसी;
विद्वत्परिषच्चर्महि तुमच्या तनुचर्माधिक मजसी.' ६१
वचनमौक्तिकें ऐशीं माझीं तत्रस्थां वीरांनीं
शंखोद्भतरवजलधींमाजी बुडविलिं अपंडितांनीं. ६२
अवचित एका वीरें सोडुनि वाताला सुखरूप
मनोविमाना मम हेतूंसह दावियलें यूरोप. ६३
अथेन्स शहरामाजिं उतरलों; भेटें तत्त्वज्ञांना;
अरिस्टॉटला थक्कचि केलें विषय काढुनी नाना; ६४
अर्वाचीना इतिहासाची दिधली त्यासी संथा;
सत्य सांगतों, मानुं नका ही सत्यानृतमय कंथा. ६५
अमेरिका खंडही तयाला अविदित पाहुनि मोठा
चमत्कार वाटला मनाला, हंसलों धरुनी पोटा. ६६
नृपति शिकंदर ऐकुनि सादर या वक्तृत्वा माझ्या
म्हणे, असे ज्या देशीं पंडित जोडिन त्या मद्राज्या. ६७
दचकुनि वदलों, कीं पांडित्य ज्ञान नसे हें माझें;
जेथुनि शिकलों तेथिल व्हा तुम्हि सुखेनैव हो राजे. ६८
असा यशस्वी बनुनि निघालों, रोमपत्तना आलों;
सभामंडपीं पाहुनि सीझरवधासि शोकिं बुडालों. ६९
स्विट्झर्लंडीं तेथुनि गेलों दुःखित मन रमवाया;
आल्प्स नगाच्या मस्तकिं राहुनि पुढें करीं मन जाया. ७०

जर्मनींत या काळीं राजा शार्लमेन धरि सूत्रां,
गेटि राजकवि असे, मोल्टके चालवि तद्रणसत्रां. ७१
राजाशीं गीर्वाणगिरेमधिं भाषण बहुत करोनी
पदवी जोडिलि सन्मानाची; पुढति निघें तेथोनी. ७२
जर्मनिची मर्यादा जों मी ओलांडीं सोत्कंठ,
चिनी लोक बहु दिसले, ज्यांच्या शेंड्या लोंबति नीट. ७३
फ्रान्सामध्यें चिनि लोकांची हो सत्ता सर्वत्र,
ऐसें वाटुनि उभा राहिलों होउनियां स्थिरगात्र. ७४
क्षण न लोटतां कळलें, कीं तो चीन देश प्रत्यक्ष;
असत्य गमलें असतें, जरि हे नेत्र नसति मज साक्ष. ७५
भूगोलामाधिं सदा फसें मी परीक्षांत जें बाल,
याचें कारण आतां उमगे विद्युत्सम तत्काल. ७६
भूगोलांचे लेखक असती सगळ्या जगतीं खोटे,
खोलीमध्यें बसुनी लिहिती मनःपूत जें वाटे ! ७७
व्यापक दृष्टि करोनी बघण्या उंचाविलें विमान,
तों देशाच्या सीमा दिसल्या विविध जनांनीं पूर्ण. ७८
चहुं बाजूंसी रशिया, जर्मनि, इंग्लंड तसा फ्रान्स,
देश दिसति हे लागुनि चीना, कवटाळिति जणुं त्यास. ७९
देशचतुष्टय पाठवि अपुल्या योद्धयांसी सीमांतें;
ते खड्गा कुंचले लावुनी रंगविती चीनातें. ८०
अहा ! सत्ययुग सुरू जाहलें ! वीर टाकुनी खड्ग
ईर्ष्येनें परराष्ट्रा असती रंगविण्यांतचि दंग. ८१
होळिपुढिल सण रंगपंचमी उरकुनि ऐशा थाटें
निज उद्देशा संपादाया लागें अपुल्या वाटें. ८२
वरि आकाश, जलाशय खालीं, जातां ऐशा मार्गें
कंटाळा आला असता, जरि सोबत नसती संगें. ८३

परि या समया कोलंबस या नामें असे प्रवासी,
तोहि निघाला अमेरिकेसी शोधुनि काढायासी. ८४
जलकन्या बहु भेटति मार्गें अर्धांगीकृतमीना;
वडवाग्नीमधिं पाक उरकिती सुगुणरूपसंपन्ना. ८५
भेटति मध्यें योजन योजन लांबीचे बहु सर्प,
भूभारक्षमशेषतनय जणुं विहरति जलीं सदर्प. ८६
सरतां जलनिधि सोडिं एकटे सहगामी लोकांसी
तद्देशीय जनांची मृगया धर्मार्थ करायासी. ८७
नैगारा धबधबा भेटला मार्गीं बळें अमोघ;
कड्यावरुनि पडतां गमला हरशिरोमुक्त गंगौघ. ८८
भव्य अलौकिक बघण्या स्थल तें थांबें कांहीं अंक;
मद्धिमानही दिसलें तत्क्षणिं हरशिरिं जेविं शशांक. ८९
सरसावतां सवेग पुढें मज सुळका लागे तुंग;
एक उभी स्त्री वरि, लावण्यामृतासिक्त जिचें अंग; ९०
जिच्या मस्तकीं सुबद्ध राहे अर्धा केशकलाप,
स्वैर धांवुनी इतर चिकुर परि पावति पवनीं कंप; ९१
एक नेत्र भूतलिं खिळलेला नतपक्ष्म विनयधारी,
दुजा समंतात् कटाक्ष फेंकित रत चंचल संचारीं; ९२
सुवर्णनिगडीं बद्ध एक कर तनुसी लगटे भीत,
निराभरण अनिरुद्ध अन्य परि ऊर्ध्वगमन अविनीत; ९३
सुधारणेची जणों पताका फडके अंचल एक,
तनुसि अन्य बिलगे, जणुं गंगेप्रति धृतभंगि तटाक. ९४
मिश्र रूप हें बघुनि ताडिलें, ही स्वतंत्रता देवी,
चरणीं अन्यां नच तुडवीतां स्वैर फिरे जी उर्वी. ९५
घनगंभीर रवें मज बाहुनि वदते विभ्रममूर्ति,
'यद्दर्थ गोलार्धा क्रमिलेंसी वस्तु समोर उभी ती; ९६

तव वदनासि विरुद्ध दिशेला वसतें करुनि मुखास.'
परिसुनि हें तत्पादिं पडलों 'कां' वदत ' विमुख झालीस ? ९७
मत्तनुची जी त्वत्तनुची ती संतति असे; म्हणोनी
अर्धांगी तुज गणुनी राहिन येथें आनंदोनी.' ९८
वचन परिसुनी किंचित् हंसुनी वदे, 'जाइं येथून;
तव देशीं मम सुत, त्यांपासुनि लाभेन तुला तूर्ण.' ९९
अमृततुल्य वच ऐकुनि वंदुनि देवी त्वरित निघालों,
वेगें थोड्या दिनीं हिमाचलमस्तकिं येउनि ठेलों. १००
तत्कुक्षींतुनि निघते मिळण्या भागीरथी समुद्रा;
अनुरोधानें तिच्या चाललों पाहत तीर्थां भद्रां. १०१
हिंडत हिंडत कांहिं दिनीं ये भागीरथीमुखासी,
अगणित जेथें चुळा टाकुनी खेळत ती जलधीशीं. १०२
पावन वारि निरीक्षुनि निर्मल झाली ऐशी वाञ्छा,
मुखमार्जन कीं स्वयें करावें तेथें उदकीं स्वच्छा. १०३
शीत स्पर्शे जागा होउनि भागीरथीस पाहीं;
तन्मुखिं मन्मुख पावन झालें, नलगे कथणें कांहीं ! १०४

[ मनोरंजन, पुस्तक ६ वें. सन १९००–०१ ]

---

## ११ विलक्षण न्यायसभा.

( साक्या )

प्रतिवर्षी मन्मानस भरवी एका न्यायसभेतें;
विचित्र तीची रीति रसिकहो ! परिसा तद्वार्तेतें. १
गत वर्षी जो दोषमुक्त हो तोचि पुढीलहि वर्षी
न्यायासनापुढें राहि उभा, पूर्वीचि दोषें दोषी. २
वकिल मित्र मम दावुं पाहतिल कायद्यांतलें कलम;
त्यांसि विनविं मी, पहा पुढति जें वमे कृष्णमुख कलम. ३

आरोपी नच दुजा, मूर्तिमान् विश्वपिता जगदीश;
अभावरूपी त्यावरि राहे महाविलक्षण दोष ! ४
अश्रद्धा नास्तिक्य तयावरि ठेविति हा आरोप;
तद्वच ऐकुनि मानस डोले होउनि संशयलोप. ५
अवसरिं अशा पुढें सरसावे प्रतिपक्षी हिमकाल,
सकंप यत्तनु कंबलवेष्टित, शिरिं नीहारदुकूल. ६
मीलितदंतपंक्तितुनि वाहे त्याचा वक्तृत्वौघ;
कर्कश रव करि, जलौघ जेवीं उपलीं रोधितवेग. ७
श्रद्धा अश्रद्धेवरची परि न शके तो उडवाया,
नास्तिक्याच्या वास्तव्यातें संशयिं कीं ठेवाया. ८
विरतवचन जैं होई, पुढती उष्णकाल सरसावे;
चंदनचर्चित तनुवरि कुसुमें, व्यजन करीं दोलावे. ९
मुखावरुनियां प्रवाह वाहे मोठा घर्मजलाचा;
वाक्प्रवाहही कोकिलवदनें चाले मंजु रवाचा. १०
विश्रांति न निज ओष्ठां देई तो ज्येष्ठापर्यंत;
त्या मागें सारुनि येइ पुढें वर्षा, जणों कृतांत. ११
झंझावात श्वास तयाचा; हातिं धुळीचा सोटा;
इंद्रधनूच्या दंष्ट्रेमधुनी निनाद करि तो मोठा; १२
विद्युज्जिव्हा लांब पसरुनी मेघगर्जनारूपें
वाणीचा वर्षाव करि, सरी कोसळुनी शिरिं कोपें. १३
फिर्यादींची दुक्कल तत्क्षणिं करी पलायन वेगीं;
मानस उठुनी स्थानावरुनी ईशातें आलिंगी. १४
निवृत्त होई संशय सारा; प्रकाश हो हृदयांत;
ब्रह्मानंदहि खेळूं लागे स्वच्छंदें आत्म्यांत. १५
दुजा नसे पर्जन्यकालसम जगदीशासि वकील;
चुकलों-हुकलों-मद्रमणीचे विस्मरलों मृदु बोल. १६

शांत अशा रजनीच्या काळीं करीं घेउनी वीणा
सुंदर कंठांतुनि आलापां काढी मंजुलगाना, १७
प्रत्यय तत्क्षणिं ये ईशाचा; बुद्धि होतसे शांत;
तत्तारस्वर वाहन करुनी मन जाई स्वर्गांत. १८
ईशाची ही होय प्रतिभू, चिंतुनि हृदयीं ऐसें
पावाया तादात्म्य तियेशीं आलिंगीं मी हर्षें. १९
एकचि आशा पुरवीं ईशा; घन जैं कर्कश गर्जे,
रमणीगायन कर्णिं तरंगे, निधन तईं हो माझें. २०

[ मनोरंजन, पुस्तक ६ वें. सन १९००–०१ ]

---

## १२ मृत अपत्याचें स्वप्नदर्शन.

( साक्या )

सुतविरहज मम शोकाचा जरि पूर ओसरे सारा,
मानसांत बहु गहन खेद तरि कायमचा करि थारा. १
तच्छैशविंच्या लीलांच्या प्रति पदार्थ दे स्मरणातें;
त्याविण शून्य गमे जग सारें तन्मयही हृदयातें. २
बालांकुर भूवरि, बालरविप्रभा नभांत बघें मी,
तदा तयाची स्मरे कोमलोज्ज्वल मुखकांतिहि नामी. ३
भूवरि जेव्हां चपल समीरण थैं थैं नाचत जाई,
क्रीडासक्त प्रिय बालाची लीला तैं मनिं येई. ४
सुप्त एक दिनिं असतां रात्रीं भास जहाला मातें—
दारावरि आघात करी कुणि बाहेरुनि कीं हातें. ५
उठुनी सत्वर दार उघडिलें, तों गत बालचि ठेला;
मिठी मारुनी प्रेमें कंठा करि वेगें रुदनाला. ६

एक करें तन्नेत्र पुसोनी कवटाळुनि दुसऱ्यानें,
बोलें मी बाष्परुद्ध कंठा मुक्त करुनि कष्टानें:- ७
'काय दशा ही झाली बाळा सुंदर तव देहाची!
अस्थिचर्म मम उरलें शोकें जेविं, तुझेंहि तसेंची. ८
गत झालासी ऐशा समजीं मग्न जाहलों शोकीं;
पुनरपि दिससी तृषित लोचनां आशा मुळिं नव्हती कीं. ९
होतास कुठें भटकत बाळा चुकल्या हरिणावाणी ?
निर्जन विपिनीं, जेथ मिळेना अन्न जरा कीं पाणी ? १०
अन्नजलांविण फार भुकेला तान्हेला झालासी;
नयनहि तैसे दिसती मातापितरां देखायासी. ११
वाट चुकोनी भटकत असती विशाल काय वनांत ?
प्रियजन निकट न दिसुनी का तूं मांडियला आकांत ?' १२
वच परिसुनि हें बाल वदे, कीं "खराच मी मृत होतों;
उचलुनि नेलें मज कीं जेथें स्वर्गलोक वसतो तो; १३
प्रकाश रात्रंदिन जेथ वसे वर्षभरीहि वसंत,
कर्णमधुर गीतें सुस्वरशीं वातीं दुमदुमतात; १४
भूक तहान जरी देतीना पीडा तत्रस्थांना,
गोडीनें बहु करिति सदा तरि ते अमृताचे पाना. १५
सर्व जनां यापरि देखियलें युक्त अतुल आनंदें;
कोण कडेवरि घे मज, जेथें सुख परमावधि नांदे ? १६
सुखसागरिं ह्या एकाकी मी होतों दुःखीं मग्न,
स्वर्गी भटकत, अनंतकालीं जीवचि असमाधान. १७
यमधर्म द्रवले मज देखुनि त्या आपत्तीमाजी;
बोलति, 'बाळा, योग्य नसे तुज चिंता वदनिं दिसे जी. १८
महाव्रतें आचरती बहु जन, लाभो स्वर्ग म्हणोनी;
तदपेक्षेपेक्षां येथें नच ये सुख उणें दिसोनी. १९

शुद्ध चरितिं तव दुरित न घडलें अल्पहि तुझ्याकडोन;
स्वर्ग अनायासें तुज लाधे; कष्टी होइं जरा न.' २०
वदलों मी, कीं 'यमधर्मा, ही मजवरि उपकृति थोर;
काय करूं परि ? येथ गमेना; मी बहु अजाण पोर. २१
भूवरि मातापितरांचें मम वास्तव्य असे जेथें,
स्वर्गाधिक मम अज्ञ बुद्धिसी क्षुद्रहि सदन असे तें. २२
पांगुळगाडा अंतरुनी जी झाली माझी हानि,
ऐरावतिं बैसोनि कधीं ती नच येईल भरोनी. २३
मातृगीत कीं सदा खुळखुळा मंजुळ करि जे बोल
त्यांसि अप्सरांच्या गाण्याहुनि गणित असें बहुमोल. २४
प्रेमयुक्त जें तेज दिसे प्रिय मातेच्या नयनांत
त्यापुढती हा प्रकाश भासे अंधकार निभ्रांत. २५
सतत वसंतें जी घन छाया भोंवतिं पसरे शीत,
माउलिच्या सावलिच्या मानें तापद ती मज होत. २६
मातापितरांच्या अंकांहुनि मऊ आसनें हीं का ?
तच्चुंबनसम मधुर अमृत का मिळे येथ ही शंका. २७
न्या मज झडकरि जेथ निराशाविकल उभय बसले ते;
तत्कंठीं कर टाकुनि शोका नेइन मी विलयातें. २८
निराधार ते जपताती मम विरहीं मद्वस्त्रांसी;
करिन सनाथ प्रकट अकल्पित होउनि शीघ्र तयांसी. २९
दिनभरि त्यांचीं मुखें दिसावीं, रात्रीं त्यांचीं स्वप्नें;
पुण्य मत्करीं घडलें किंचित् तरि हा वर मज देणें.' ३०
यमधर्में संतुष्ट होउनी आणियलें मज येथें;
राहुं सदा अन्योन्यसमागमिं तात सुखाकुल चित्तें." ३१

अमृततुल्य या परिसुनि वाक्यां दृढ आलिंगीं बाळा;
परि त्यायोगें जागृत देखीं करपीडित हृदयाला ! ३२

[ विविधज्ञानविस्तार, पुस्तक ३७. सन १९०६ ]

---

## १३ सृष्टिदेवता आणि हृदयदेवता

पद. ( चाल—नंदनवनदेवीनें० )

सृष्टिदेवता भीषण सखये ! मधुर तरी भासे;
तत्कारण मम हृदयदेवता, सन्निध जी विलसे !
धूलिपूर्ण दश दिशा धुंद या, तोषद परि होती;
प्रीतिपूर्ण तव धुंद दृष्टि कीं लागे मजवरती !
अंधकार चहुंकडे पसरला निबिड घोर दिसतो;
उपकारक परि होइ मला; कीं अंध जनां करितो !
कृष्णवर्ण हे मेघ भयंकर, सुखकर होति परी;
सदृश तुझी मम रुळते स्कंधीं कीं कुंतलकबरी !
मेघोदरिं ही उज्ज्वल चपला बहु भयदा गमती,
तव केशांसि विभागित भांग न दिसता जरि पुढती !
विविधवर्ण विस्तीर्ण इंद्रधनु भयद, परी सुखवी;
अंतरंगिंचे तरंग दावित कीं भ्रू तव रमवी !
कर्कश हा घननाद, तरी मज मंजुलसा वाटे,
श्रवणीं तव रव कोकिलकूजितसम जोंवरि दाटे !
शैत्ययुक्त हा वात खरोखर मज बाधा करिता,
स्निग्ध उष्ण हा बाहु तुझा जरि नसता मजभंवता !
वृक्ष कडाडत पडति धरातळिं, चित्ता त्रासविते,
कोमल जरि तव देहलता ही बिलगती न मातें !
तव सहवासीं दयिते ! गमते दिनसदृशाचि निशा !
सुदिनतुल्य दुर्दिन, संपत्सम जरि विपदा पविशा !

[ मनोरंजन, पुस्तक १९ वें. सन १९१३–१४ ]

---

## १४ आगगाडी.

( उपजाति )

ही लोहरथ्या जणुं दीर्घ नाडी
स्वदेशदेहीं पसरे प्रचंडीं,
द्वारें जिच्या पोषक सत्त्व ओढी
अहर्निशीं सत्वर आगगाडी. १

ज्या पार्श्वभागीं दिसतात तारा,
विद्युज्जवें वाहति वृत्तभारा,
तारा न त्या; देशतनुप्रदेशीं
ही ज्ञानतंतुप्रसृतीच खाशी. २

कन्याकुमारी द्रववावयातें
हिमाद्रिचें अंतर दृष्टिपातें
जो उत्तराशेरित रम्य फेंकी,
कटाक्ष तो हा पथ आक्रमी कीं. ३

ही सप्ततंत्री जणुं लोहरथ्या,
कीं सृष्टि जीच्यावरि शीघ्रगत्या
निजांगुलि प्रेमळ चाळवीते,
गभीर उत्पादित सुस्वनातें. ४

जेव्हां तमोव्याप्त धराप्रदेशीं
धांवे निशाकालिं महोरगीशी,
फूत्कार अंगारकणांहिं पूर्ण
नासामुखें सोडित तैं विकीर्ण. ५

दिव्य ग्रहांची रविपूर्व माला
शौरीसि कीं लक्षुनि जावयाला
धांवे, प्रियाबाहुलताच जैशी
पडावया वल्लभकंठदेशीं. ६

तेजःकणांनीं नभ पूर्ण साचें
दिसे निळें पातळची बुट्यांचें;
शोभे जरीचा जणुं कांठ त्यासी
प्रकाशमान् अग्निरथ प्रवासीं. ७
सशृंखला, आयससंधि, दीर्घ,
भासे रथांची द्रुतगामि रांग,
कीं बद्धहस्ताब्जतला सलीला
नृत्यीं रता नूपुरपाद बाला. ८
मंजुस्वना बांधुनि पायिं चाळ
हातांत घेवोनि तशीच टाळ,
कीं ईशनामीं रत भक्तवृंद
शेतासि जाई गतिनें अमंद. ९

---

REFBK-0002557
REFBK-0002557

## अढळ पद अथवा अंत्यजाष्टक

( शिखरिणी )

जगीं जें जें ऊर्जस्वल नियत त्या त्या अवनति;
तशी नीचावस्थेंतिल अणुसिही उन्नत गति;
परी या सिद्धांताप्रतिहि अपवाद स्थिर वसे:
जनीं या एकाकी अचलपद तो अंत्यज असे ! १
धराकंपें नम्रा अचलतति भूमीवरि पडे;
सरिन्नाथाचें तज्जनकिं चिररूपांतर घडे;
पुराचें कांतार, क्षणिं घन वनाचें पुर दिसे;
जनीं या एकाकी अचलपद तो अंत्यज असे ! २
पुरा ब्राह्मण्यातें नृप मिळविती ते कितिकदां;
तयाचे स्वामीही निजगुणबलें क्षत्रियपदा;